# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १२-०५-२०१७ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक १२ मे २०१७ रोजी (का.प.क्र. ४१) मा.महापौर श्री. भगवान (बापू) देविदास घडमोडे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-४० वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.डी.एम.मुगळीकर,आयएएस नगरसचिव, श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| २. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ३. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ४. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ५. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ६. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ७. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ८. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ९. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १३. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १४. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १५. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १६. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| १७. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| १८. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| १९. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २०. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २१. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २२. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २३. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २४. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २५. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २६. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २७. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |

| | |
|---|---|
| २८. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| २९. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३०. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३१. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३२. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३३. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३४. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ३५. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ३६. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ३७. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ३८. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ३९. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४०. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ४१. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ४२. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ४३. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ४४. | स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ४५. | स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान |
| ४६. | स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन |
| ४७. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ४८. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ४९. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ५०. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ५१. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ५२. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ५३. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ५४. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ५५. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ५६. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ५७. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ५८. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ५९. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ६०. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ६१. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ६२. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ६३. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ६४. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |

| | |
|---|---|
| ६५. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ६६. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ६७. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ६८. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ६९. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ७०. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ७१. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ७२. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ७३. | स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| ७४. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ७५. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ७६. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ७७. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ७८. | स.स.कु.जमादार सायली भागवत |

नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन

श्री.गजानन बारवाल :माजी आमदार व या सभागृहाचे सदस्य श्री.किशनचंद तनवाणी यांचे वडील स्व.लेखराज तनवाणी यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :यास अनुमोदन आहे. तसेच त्यांचे कुटुंबीयांना शोक संदेश पाठविण्यात यावा. यासाठी एक अधिकारी नियुक्त करावे.

यास स.श्री.कैलास गायकवाड स.श्री.रेणुकादास वैद्य स.श्री.अब्दुल नाईकवाडी यांनी अनुमोदन दिले.

मा.महापौर :ठिक आहे. सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभे रहावे. संबंधीतांच्या कुटूंबीयांना शोक व्यक्त केल्या बाबत पत्राने कळविण्यात यावे.

या वेळी स्व. लेखराज तनवानी यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**विषय क्रमांक ९९४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक ०४,०५ व ०६ फेब्रुवारी-२०१७ रोजी औरंगाबाद शहरामध्ये स्वच्छता अभियाना अंतर्गत केंद्रीय पथक (QCI) यांनी शहरात येऊन सर्वेक्षण केले होते. सदर सर्वेक्षणामध्ये औरंगाबाद महानगरपालिका २९९ व्या क्रमांकावर गेली आहे. त्याअनुषंगाने घनकचरा विभागाच्या कामकाजाबद्दल विचार विनिमय करून योग्य त्या उपाययोजना करणे बाबत.

श्री.गजानन मनगटे :स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत शहराचा क्रमांक २९९ गेला. मा.श्री.विनोद घोसाळकर यांनी स्थायी समीतीच्या सदस्यांना यावर विशेष सभा आयोजित करण्या बाबत मा.महापौरांना पत्र द्यावयास लावले. त्यानुसार सभा आयोजित केली त्याबद्दल मा.महापौर व मा.श्री.विनोद घोसाळकर यांचे अभिनंदन करतो.

श्री.नंदकुमार घोडेले :स्थायी समितीच्या सहा सदस्यांचे तसेच मा.महापौर यांचे अभिनंदन. हे ऐतिहासीक शहर आहे. टॉपटेन मध्ये नंबर लागेल असा दावा प्रशासनाने केला होता. ४३४ शहरापैकी २९९ क्रमांक आला. खालून हा क्रमांक १३५ वर येतो. यापुर्वी सर्वेक्षण केले तेंव्हा ५६ क्रमांक होता. ही घसरण झाली तरी कार्य समाधानकारक आहे. असे घनकचरा प्रमुख यानी स्टेटमेंन्ट केलेले आहे. कितपत योग्य आहे. २००० पैकी ७९४ गुण मिळाले. गुणवारीचा टक्का हा ३९ वर असून आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. वेगवेगळे निकष समितीने लावले होते. त्यात कचरा गोळा करणे, प्रक्रिया करणे असेल, खुल्या जागेत शौचालयास बसण्याचा विषय,नागरीकांच्या प्रतिक्रिया, हा संपुर्ण सहभाग त्यात आहे. कचरा जमा करणे व तो उचलून नेणे. यासाठी घनकचरा व्यवस्थापनावर जवळपास ६०-६५ कोटी खर्च येतो. लोकल फंडचे ऑडीट व्हावे. ५०० टन कचरा निघतो. त्यातून ३५० टन जमा होतो. १५० टन पडून असतों. १७०० कर्मचारी काम करतात. ५००० कर्मचारी आवश्यक आहे. स्वच्छता निरीक्षक १० आहे. ॲडीशनल चार्ज जवानाकडे दिला. त्याची संख्या वाढवावी. कमर्शियल भागात रात्रीची साफसफाई व्हावी तसेच ओला-सुका कचरा असे वर्गीकरण करावे. रिक्षावर जीपीएस सिस्टीम बसविली नाही. कचरा कुंडी मुक्त करावी. २५ वार्डात आजही कचरा संकलन होत नाही.

श्री.राजू शिंदे :२९९ क्रमांकवर का गेलो? रॅकींग मागे का आले. खुलासा करावा.

श्री.नंदकुमार घोडेले :हॉटेलचे उरलेले कुजलेले अन्न हे ड्रेनेज मध्ये जाते. संबंधीतांस नोटीस द्यावी. शहरातील सर्वे करावा. प्रत्येक वार्डात हजेरी सेन्टर असावे. CCTV कॅमेरे बसवावे. कचऱ्यासाठी वाहने खरेदी करावी. कचऱ्यावर प्रोसेसींग प्रक्रिया करावी. नारेगाव येथील कचरा डेपो कांचनवाडी येथे येत असल्याचे समजले तसे होऊ नये माझा विरोध आहे. नारेगाव येथे प्रोसेसींग युनीट करावे. डीपीआर तयार करावा. शौचालयाचे नियोजन करावे. स्वच्छतेच्या ॲप मध्ये शुन्य मार्क आहे. खाजगी संस्थेला दिले होते. इंदौर शहर १ क्रमांकावर आहे. तेथे पाहणी करावी. घनकचरा व्यवस्थापनावर चांगल्या पध्दतीने नियोजन करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :वेगळा विषय आहे. मा.महापौराच्या परवानगीने मांडतो आहे. महापालिकेच्या मालकीची ३३०० क्रमांकाची लाल दिव्याची गाडी जी मा.आयुक्त वापरतात तीचा पुणेजवळ अपघात झाला. अशी माहिती मिळाली ती गाडी कोण घेऊन गेले? मा.आयुक्ताची परवानगी होती का? मा.आयुक्त येथे उपस्थित आहे. असे असतांना लाल दिव्याची गाडी कशी घेऊन जातात? हे योग्य नाही. माहिती द्यावी.

मा.महापौर :मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :मा.प्रधान सचिव, नगरविकास यांचेकडे एक बैठक आयोजीत केली होती. त्या बैठकीला आयुक्तांना बोलविले होते, परंतु आज सभा असल्याने माझ्या ऐवजी बैठकीसाठी श्री.रविंद्र निकम व श्री.अफसर सिध्दीकी यांना मी माझ्या परवानगीने पाठविले. ती गाडी घेऊन जाण्यास मी परवानगी दिली होती

चाकण जवळ जात असतांना एका ट्रकमूळे गाडीला खरचटलेले आहे फारसे नुकसान झाले नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :लाल दिवा लावण्याची परवानगी आहे का? अपघात झाला तेंव्हा दिवा चालू होता.

मा.आयुक्त :दिव्याला कॅप लावलेली होती.

श्री.जंजाळ राजेंद्र :लाल दिवा चालू होता, अशी माहिती मिळाली. ती गाडी वापरण्याची नेमकी परवानगी कुणाला आहे?

मा.महापौर :मा.आयुक्तांनाच त्या बैठकीला जायचे होते आज ही बैठक असल्यामूळे आयुक्त गेलेले नाही. दोन अधिकारी यांना तातडीने विमानाने पाठवले असते तर जास्त खर्च आला असता म्हणून आयुक्तांनी त्यांचे परवानगीने पाठविले आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :अधिकाऱ्यांना परवानगी दिली तशी मा.महापौरांना लाल दिव्याच्या गाडीत जाण्याची परवानगी देणार का? खर्च वाचविण्यासाठी नियमाच्या बाहेर जाऊन काम करता येते का? तशी तरतुद आहे का? दिवा लावून फिरत होते. दुसरी गाडी देता आली असती.?

श्री.राजू शिंदे :सभागृहाचा विषय चालू आहे. त्यावर चर्चा करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :स्वच्छतेच्या बाबतीत या शहराचा २९९ क्रमांक का आला? किती खर्च झाला? काय उपाययोजना केली होती? सर्व माहिती घ्यावी.

विभाग प्रमुख(घ.कचरा):स्वच्छ सर्वेक्षणासाठी दिनांक २०,२१,२२ जानेवारीला पथक शहरात दाखल झाले भ्रष्टाचाराच्या प्रकरणात त्यांना तेंव्हा अटक करण्यात आली. पुन्हा रि-सर्वेक्षणासाठी दिनांक ४, ५, ६ फेब्रुवारीला पथक शहरात दाखल झाले. त्यात सिनीअर आणि दोन ज्युनियर ॲसेसर होते. सिनीयर ॲसेसर हे ऑफिसमध्ये डॉक्युमेन्ट तपासतात. ज्युनिअर ॲसेसर जे शहराच्या चारही भागात जाऊन फिल्ड ऑब्जरवेशन करणार होते. स्वच्छ सर्वेक्षणामध्ये महापालिकेसाठी २००० मार्काची परीक्षा होती. त्यात एक म्युनिसिपल डॉकुमेन्टेशन जे की, मनपाकडे जे कागदपत्राचे पुरावे आहे. त्यास ९०० मार्क होते. दोन सदस्य शहरात फिरणार व फोटो काढणार. ते फोटो ऑनलाईन अपलोड करुन त्यावर ५०० मार्क होते. तिसरा बेस फिल्ड बाय सिटीजन आणि ॲप, हा स्वच्छता ॲप महापालिकेचा नसून केंद्र सरकार भारत द्वारे जो ॲप तयार केला तो होता. यात टोटल स्कोअर ७९४ आलेला आहे. महापालिका डॉकुमेन्टेशन मध्ये ३४६.४७ फिल्ड ऑब्जरवेशन मध्ये १७८ मार्क पडले. सीटीजन फिल्ड बाय स्वच्छता ॲप मध्ये ६०० पैकी २६८ मार्क आहे. स्क्रीनवर जे दिसते ते ॲव्हरेज वर नाही तर जर पहिल्या १० मध्ये यायचे असेल तर देशातील जी पहिली सिटी आली. त्या बरोबर तुलना होणे आवश्यक आहे. दुसरे कॉलम मध्ये इंदौरचे मार्क ॲड केले तसेच महाराष्ट्रात पहिली सिटी जी देशात आठ क्रमांकावर आहे ती नवी मुंबई तीचे मार्क मेन्शन केले. चौथ्या कॉलम मध्ये राज्याची जी सरासरी आहे पाच मध्ये देशात आलेल्या सिटीची सरासरी मेन्शन केली. महापालिका डॉकुमेन्टेशन मध्ये ३४६ मार्क पडले. तेच इंदौरला ८७५ पडले. यावर अभ्यास केला असता, असे जाणवले की, बऱ्याच सिटीमध्ये कंत्राटी पध्दतीने स्वच्छतेचे काम होते

त्यामूळे डॉकुमेन्टेशनचे मोठे पुरावे असतात. जे बचतगटाचे कर्मचारी होते त्यांचे डॉकुमेन्टेशन दिले आहे. म्युनिसिपल डॉकुमेन्टेशन मध्ये पहिला भाग कचरा जमा करणे व वाहून नेणे. त्यात मजूर व वाहन आले. सध्या वाहने २३० त्यापैकी १०८ मनपाचे व १३० कंत्राटी पध्दतीवरचे. ४२ हुकलोडर व ७ इतर वाहने असे एकूण ४९ वाहने आहेत. स्कीपलोडर छोट्या ६२ व इतर सात वाहने काही ट्रक्टर आहे व इतर वाहने यात ३६० पैकी १८२ गुण देण्यात आले. यात गुण कमी होण्याचे कारण की, जीपीएस ट्रॅकींग नाही. त्यामूळे पारदर्शकता येते त्यास जास्त महत्व दिले होते. तसेच कलेक्शन सेन्टर कुठेच नाही. जी १०-१५ वार्डाच कचरा एकाच ठिकाणी जमा करून तो नारेगाव येथे नेणे ती सिस्टम कुठेच नाही. त्यामूळे काही मार्क गेलेले आहे. ११५ वार्ड पैकी ६० वार्डात सेग्रीकेशन चांगले आहे, परंतु या पैकी २०-२५ वार्डात कचऱ्यावर उत्तम प्रक्रिया होते उर्वरीत वार्डात जागेच्या अभावामुळे त्यांचे कम्पोस्ट खत तयार करू शकत नाही. विनंती आपण प्रशासनाला मदत करावी. जे की वार्डातील कचऱ्याची वैज्ञानिक पध्दतीने विल्हेवाट लावता येईल.

श्री.राजेंद्र जंजाळ :२५ वार्डात कचऱ्याची विल्हेवाट ही शास्त्रोक्त पध्दतीने होते, म्हटले त्यात माझा वार्ड येतो. वार्डात सीआरटीने ओला-सुका कचरा वेगळा केला. त्यांचे कन्पोस्ट करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली. परंतु सहा महिन्यापासून कचरा डंपीग करून ठेवतो. रासायनिक तयार झाले. आता आठ दिवसांपासून तेथे आग लागली धुर निघतो. नागरीकांना त्रास होतो. जो खुलासा केला तो अपेक्षीत नसून स्वच्छतेच्या बाबतीत शहराचा नंबर दुर का गेला? याची प्रत्यक्षात कारणे काय ते सांगावे.

श्री.रेणुकादास वैद्य :ग्राऊंड रियालिटी काय? कशामूळे नंबर खाली आला? प्रत्येक बाबतीत साधारणपणे असे बोलून ंखुलासा करणे योग्य नाही. जीपीएस बसवा. मागिल दोन वर्षापासून सांगतो. का बसविले नाही? त्यामूळे मार्क जास्त मिळाले असते असे अधिकारी सांगतात. इतर शहरात कंत्राटी पध्दतीने कामे जास्त असल्याने मार्क जास्त मिळाले. याचा अर्थ कंत्राटी पध्दतीने काम करावे. असा होतो. कोणत्या ६० वार्डात कचऱ्याची व्यवस्थीत विल्हेवाट चांगली होते? हे कागदावर करून दिशाभूल करू नये. ज्या गोष्टी नाही, त्या नाहीच. जे चुक झाली, ती झाली भविष्यात काय करता येईल? ते पहावे.

श्री.नासेर सिद्दीकी :ओला-सुका कचरा वेगळा करण्यासाठी स.सदस्यांनी मदत केलेली आहे. परंतु कालातंराने ते उचलला गेला नाही. माझ्या वार्डात कचरा प्रोसेस होत होती कालातंराने ते बंद केली.

श्री.सय्यद मतीन :बजाज कंपनीने सीआरटी एजन्सीच्या मार्फत कचरा साफसफाईसाठी १.६० कोटी दिले. त्यातून कोणते कामे केली? मुस्लीम सदस्यांच्या वार्डात लेबर संख्या कमी आहे.

मा.महापौर :सर्व वार्डात स्वच्छता व्हावी. याची दखल घ्यावी. तरच रँकींग मध्ये हे शहर येऊ शकते.

श्री.अब्दुल नाईकवाडी :जुन्या शहरात कचरा जास्त आहे तो उचलावा.

श्री.राजू शिंदे :शहर स्वच्छतेच्या बाबत शासनाची प्रश्नावली त्यानुसार अंमलबजावणी केली का प्रश्नावली प्रेझेन्टेशन मध्ये का नमूद केले नाही. खुलासा करावा.

विभाग प्रमुख-घनकचरा :प्रश्नावली मोठी आहे. पुस्तक आहे. त्यात छोटे छोटे प्रश्न आहे. त्यामध्ये कचरा जमा करणे व वाहून नेणे. या अंतर्गत १०-२० प्रश्न आहे.

श्री.राजू शिंदे :केंद्र शासन प्रश्नावलीनुसार काम केले नाही. म्हणून मार्क कमी मिळाले. किती प्रश्नाचे उत्तर दिले.

विभाग प्रमुख-घनकचरा :तत्कालीन समन्वयक श्रीमती कुलकर्णी मॅडम यांनी या प्रश्नावलीचा अभ्यास केला. तयारी चांगली केली होती. त्या वेळी मी येथे कार्यरत नव्हतो.

श्री.राजू शिंदे :यापुर्वी मी जे शुन्य नियोजन अधिकारी बोललो होतो. ते सत्य आहे. अधिकारी आपसात समन्वय ठेवत नाही. त्यामूळे ५६ नंबरवर असेलेले हे शहर २९९ वर गेले ही चुक कोणाची आहे. केंद्र शासनाने नियमावली केली त्याचे पालन केले गेले नाही.

विभाग प्रमुख-घनकचरा :प्रश्नावली उपलब्ध झाली होती. त्यानुसारच तयारी केली. त्या वेळी डॉकुमेन्टेशन सपोर्ट देण्यात आले होते.

श्री.राजू शिंदे :पुर्वीचे समन्वयक यांनी चांगला अभ्यास केला, असे सांगतात. त्यानंतर ज्यांना चार्ज दिला. त्यांनी अभ्यास करायला पाहिजे होता. त्या पथकाला लाच मध्ये अडकविले गेले म्हणून हा नंबर आला का पुर्वीचा नंबर पैसे देऊन घेतला होता का सर्व माहिती दयावी.

मा.महापौर :डॉ.जयश्री कुलकर्णी यांनी खुलासा करावा.

आ.वैद्यकीय अधि. :जेंव्हा QCI ही कंपनी आली, ती खाजगी होती. सेन्ट्रल सरकारने स्वच्छ सर्वेक्षण २०१७ मध्ये दरवर्षी काही शहराचे सर्वेक्षण हे स्वच्छ भारत अभियान मध्ये करीत होते. या कंपनीला आऊटसोर्स केले. कंपनीद्वारे ५०० शहराचे सर्वेक्षण करण्यात आले. सुरवातीला दिनांक २२,२३,२४ जानेवारीला कमेटी आली. त्यावेळी त्यांना ॲन्टीकरप्शनच्या प्रकरणात कार्यवाही केली. नंतर फेब्रुवारी मध्ये कमेटी आली. प्रत्येक शहरासाठी त्यांनी एकच प्रश्नावली दिली होती. लहान मोठे ३५० प्रश्न कमर्शिलय मार्केटच्या ठिकाणी कचरा विल्हेवाट लावणे, संकलन करणे, जागेवर कचरा नष्ट करणे, यास जास्त मार्क होते. प्रायोगिक तत्त्वावर गुलमंडी येथे सुरू केले होते. सर्व कमर्शियल मार्केट मध्ये सुरू होणे अपेक्षीत होते.

श्री.रेणुकादास वैद्य :स्वच्छतेबाबत कमी कुठे पडलो?

श्री.राजू शिंदे :कमर्शिलय मार्केटच्या ठिकाणी कचरा संकलन करणे व विल्हेवाट लावणे यासाठी काय केले? नियमात काय होते त्याचे पालन केले का?

श्री.राजेंद्र जंजाळ :हॉटेल, मगंलकार्यालय वेस्टेज, अन्न विल्हेवाट लावण्याची जबाबदारी कुणाची आहे?

आरोग्य वै.अधि. :हॉटेलचा कचरा प्रायव्हेट व्यक्तीकडे आहे. तो घेऊन जातो व वराह पालनाचा बिजनेस आहे त्यांना ते देतात.

श्री.राजेंद्र जंजाळ :चुकीची माहिती देत आहे. हॉटेलचे सर्व अन्न नारेगाव डेपोत नेले जाते त्यामूळेच तेथे कुत्र्याची संख्या वाढली आहे.

श्री.राजू शिंदे :बायो-मेडीकल वेस्टचे सर्व साहित्य तेथे जाते. दवाखान्यात गर्भपात केलेले बाळाचे शव कचराडेपोत येते. तेथे कुत्रे लचके तोडतात. ही सत्य परीस्थिती आहे आणि आता केंद्रशासन व प्रदुषन नियंत्रण मंडळाचे असे नियम आहे की, डंपीग ग्राऊडला कुठेच मान्यता नाही.

श्रीमती सायरा बानो :केंद्रीय पथक कमेटी आली होती. त्यांनी काय सजेशन दिले?

श्री.सय्यद मतीन :बजाज कंपनीने १.६० कोटी स्वच्छतेच्या कामासाठी दिले. सीआरटी कंपनीला काम दिले होते. त्या एजन्सीने काय काम केले? हिशोब मागवावा.

श्रीमती माधुरी देशमुख :शहराचा स्वच्छतेच्या बाबत २९९ क्रमांक जातो व त्यावर चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करावी लागते. ही लाजीरवाणी गोष्ट आहे. सीआरटीच्या माध्यमातून झालेल्या कामाचा हिशोब घ्यायला पाहिजे. ही रक्कम मनपाच्या कामगारावर खर्च केली असती, तर चांगले काम झाले असते. माझ्या वार्डात दररोज कचरा कलेक्शन होत नाही. शुक्रवारी कचरा उचलला तर शनिवारी ती गाडी येत नाही. रविवारी सुट्टी असते म्हणजे चार दिवस कचरा पडून असतो. ओला-सुका कचरा वेगळा नागरीक करतात. परंतु तो उचलला जात नाही. जेंव्हा सण असतो व्हीआयपीच्या बैठका असतात. तेंव्हा शहर स्वच्छ करतो. तर दररोज का होत नाही. ग्राऊंड लेव्हलवर काय अडचणी येतात? हे विचारात घेणे महत्वाचे, कामगारांना वेळेवर पगार द्यावा जे काम करणार नाही. त्यांना कोटीने पैसे देतो हे योग्य नाही. वार्डात कम्पोस्ट साठी जागा दिली होती. तेथील खत काढून नेत नाही. नागरीक घरातून कचरा आणेपर्यंत गाडी पुढे जाते. ज्येष्ठ नागरीक त्या गाडीमागे कचरा घेऊन धावत जातात. हे लक्षण स्मार्ट सिटीकडे जाण्याचे नाही. सर्वच बाबतील दखल घेऊन कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.केंद्रेकर साहेब असतांना माझी सीटी टकाटक करण्याचे अभियान चालु केले सीएसआरच्या माध्यमातून अनेक कंपनीचे निधी येणार होते. शहर स्वच्छतेच्या दृष्टीने चालले आहे असे वातावरण झाले होते. नंतर त्यांची बदली झाली अनेक अडचणी असतांना व आहे त्या रिसोर्सेचा वापर करीत नाही. हे लक्षात येते. मा.केंद्रेकर साहेब गेल्यानंतर सीआरटी एजन्सीचे काम दिसले नाही. विविध कंपनीने दिलेले पैसे सुध्दा कुठे खर्च होतात? हिशोब मागवावा. रस्ता साफ-सफाईसाठी एक मशीन खरेदी केली होती. ते वाहन दिसून येत नाही. त्यावेळी हेच कर्मचारी काम करीत होते. आजही तेच काम करतात. परंतु नियोजन व्यवस्थीत नसल्याने ही वेळ आली. ४०० टन कचरा उचलला जात असला, तरी ५० कोटी खर्च वार्षीक होतो. मा.आयुक्त ही सकाळी वार्डात फिरतात. एक टन कचरा उचलण्यावर ३४७२ रूपये येथे खर्च होतो. सोलापूर व इतर मनपामध्ये खाजगी एजन्सी मार्फत कचरा उचलला जातो. एक टन कचरा उचलण्यासाठी ११८२/- रू. खर्च येतो त्याप्रमाणे काम केले, तर रु.१७ कोटीच खर्च येणार आहेत. जे की, रु.३३ कोटीची बचत होऊ शकेल. खाजगीकरणातून स्वच्छतेचे काम केले तर सध्या सफाई मजूर कर्मचारी असेलेले यांना स्वाईप मशीन देऊन घरोघरी जाऊन मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीसाठी देता येईल. २५ टक्के

वसुली वाढवू शकते. बँका हे मशीन उपलब्ध करून देतात. यामूळे वाहनावरील खर्च कमी होईल. डिझेल, लेबर पेमेंन्ट, गाड्या वेगळया लागतात तो अतिरिक्त खर्च सोडून एक टन कचरा उचलण्यासाठी ३४७२ खर्च येतो.हा खर्च इतर मनपाच्या खर्चाच्या तीन पट जास्त आहे.याचा विचार करावा.एवढा खर्च होऊन ही शहर स्वच्छ होत नाही.सीआरएसच्या माध्यमातून येणारा फंड इतर कामासाठी वापरता येईल जे सेन्ट्रलायजेशन करायचे त्या बाबतीत दोन दिवसापुर्वी मित्रमंडळ हौसींग सोसायटीला भेट दिली. प्रत्येक सोसायटीच्या अध्यक्ष व सचिव यांना बोलवून मीटींग कॉल करणार असे मा.आयुक्तांनी म्हटले आहे चांगली गोष्ट आहे.असे सर्व पध्दतीने काम केल्यास शहर स्वच्छ होईल.

श्री.गजानन बारवाल :स्वच्छतेबाबत दर महिन्याला अहवाल येतो. कुठला कचरा उचलला नाही? कुठे साफाई झाली? स.सदस्य माहिती घेत असतात, रॅकींग २९९ गेला. यांची कारणे वेगवेगळी असू शकतात. कमी कर्मचारी व वाहने कमी आहेत. कलेक्शन सेन्टर नाही. एक गाडी कचरा घेऊन गेल्यानंतर पुर्ण दिवस जातो. लहान गाडयाची आवश्यकता आहे. काही नाल्याच्या ठिकाणी कॉंक्रेटींग केले. ते काढण्याची गरज आहे. त्यामूळे कचरा अडकतो. ज्याचे घर तुटलले आहे. ती घाण लोक आणून टाकतात. वार्ड अधिकारी यांना काही अधिकार देण्याची गरज आहे. नाला व नाल्यांची साफसफाई करावी. वार्ड अधिकारी यांना तसे कळवावे खाजगी रिक्षा यावर कन्ट्रोल नाही. आणखी वाहने वाढवावी.

श्रीमती किर्ती शिंदे :कचरा आस्थापनेवर ३७ कोटी खर्च करतो. कचरा हा दररोज सकाळी ६-१० या वेळेत कलेक्ट झाला पाहिजे. कर्मचारी कमी आहे. त्यामूळे कलेक्शन होत नाही. काही कर्मचारी सुट्टीवर असतात. व्यापारी १० नंतर दुकान उघडतात. त्यामूळे ते नाल्यात कचरा आणून टाकतात. भौगालिक परीस्थिती पाहता प्रत्येक वार्डातील समस्या वेगवेगळी आहे. कर्मचारी बदली करणे, वाहने कमी करणे हे अधिकारी परस्पर निर्णय घेतात. अशा वेळी एस आय व नगरसेवकांना विश्वासात घेतले पाहिजे. शाळा कॉलेज यांना जनजागृती करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. यंत्रसामुग्री खरेदी करतांना प्रत्येक वार्डाचे सदस्यांना विश्वासात घेऊन खरेदी करावी.

श्रीमती मनीषा मुंढे :वार्डात दीड वर्षापासून ओला-सुका कचरा केला जातो. कचरा डंपिंग करण्यासाठी खड्डे घेतले तेथे कचरा टाकला जात नाही. १२ कर्मचारी कचरा जमा करण्यासाठी आहे. कर्मचारी संख्या वाढविण्यात यावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:हॉटेल चालक कुठेही कचरा टाकतात. त्यांची बैठक घ्यावी. समजावून सांगावे. त्यावरही ऐकणार नसेल तर कठोर कार्यवाही करावी. एमएसईबी विभाग झाडे छाटतात. रस्त्यावर घाण पडते, ती त्यांनीच उचलावी. सीआरटी एजन्सी ऑन पेपरच काम करतात. प्रत्यक्षात काम नसते. खुलासा घ्यावा. ओपन प्लॉट मालकाची बैठक घ्यावी. तेथेही कचरा टाकला जातो. ओला-सुका कचरा वेळेवर उचलला जावा.

श्री.जमीर कादरी :सीआरटी एजन्सीने जे काम केले त्याची चौकशी करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :मा.मंत्री महोदय येणार असेल त्यावेळी साफसफाई चांगल्या प्रकारे होते. इतरही दिवशी का होत नाही? दवाखान्यातील मेडीकल वेस्ट कचरा उचलण्याकरीता नाशिक येथील ऐजन्सीला नेमले होते. ती एजन्सी बंद केली. तरी ते दवाखान्यांना नोटीसा देऊन पैसे देण्याची मागणी करीत आहे. एजन्सी पैसे वसुल करीत आहे. काम करीत नाही. नाले पुर्णपणे साफ-सफाई होत नाही. पाण्यावरील घाण काढली जाते. खाली गाळ असतो, तो काढला जात नाही. त्यावर किती खर्च होतो?

श्री.सिताराम सुरे :शहर स्मार्ट सिटीमध्ये आले. कर्मचारी संख्या कमी आहे. माझ्या वार्डात सहा कॉलन्या आहेत. तेथील कचरा एक दिवसाआड सुध्दा उचलत नाही. श्रीमती खरपे मॅडम सुट्टीवर असून श्री.अजमत खान यांचेकडे चार्ज दिला. श्रीमती खरपे यांचे जागेवर दुसरे अधिकारी नेमावे. ११ मजूर त्यात तीन महिला दोन लोंडींग रिक्षाने वार्डाचा कचरा उचलून संकलन होत नाही. रस्ते खराब असल्यामूळे गाड्या मध्ये जात नाही. एखाद्या संस्थेने काम केले नाही व महापालिकेची स्वच्छता होत नसेल तर योग्य नाही. त्या संस्थेवर कार्यवाही व्हावी. मजूर मधून जवान कर्मचारी नेमले ते वेळेवर हजर राहत नाही.

श्रीमती शोभा बुरांडे :माझ्या वार्डात मंगल कार्यालयांची संख्या जास्त आहे. ते नाल्यामध्ये कचरा टाकतात.

श्री.बन्सी जाधव :वार्ड क्र.२ मध्ये ४ लेबर सफाईसाठी, एक ट्रक्टर याची संख्या वाढवून द्यावी. साफसफाई होत नाही. कॅरीबॅग मूळे कचरा वाढला. त्या बंद कराव्या.

श्री.भाऊसाहेब जगताप :प्रत्येक वार्डात कचरा पडून आहे. गाडी कचरा संकलनासाठी तीन वाजता येत असल्याने नागरीक कचरा नाल्यात भिंतीच्या कडेला टाकतात. प्रत्येक वार्डात वाढीव रिक्षा द्याव्यात. कॅरीबँग बंद कराव्यात. राजगूरूनगर, मुकूंदनगर वार्डात कचरा नेण्यासाठी रिक्षा ट्रक्टर नाही. रिक्षा द्यावी. दररोज लेबर कामाला येत नाही. याची दखल घ्यावी. स्वच्छतेसाठी असलेल्या यंत्रणा यांनी दररोज काम केले पाहिजे तरच शहर स्वच्छ होईल.

कु.सायली जमादार :सातारा-देवळाई येथील लोकसंख्या विचारात घेऊन कचरा संकलनासाठी गाड्या देण्यात याव्यात. गाडी येत नाही म्हणून लोक रस्त्यावर, भिंतीलगत कचरा टाकतात. कर्मचारी द्यावे कचरा डंपीग पॉईन्ट नाही. जागा उपलब्ध करून द्यावी. नाले सफाई करावी. पुर्ण गाळासहित घाण काढावी व ते उचलून दुसरीकडे न्यावे.

श्री.राजू शिंदे :कर्मचारी कमी असल्याने स्वच्छता होत नाही. असे अनेकांनी म्हटले. डिसेंबर मध्ये कर्मचारी घेणे बाबत टेंडर कॉल केले होते. त्यात ४२३ मजूर घेणार होतो. ती कार्यवाही का थांबली? कमेटीत कोण होते?

श्री.नंदकुमार घोडले :वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयाचे टारगेट पुर्ण केले नाही. ७ हजार पैकी ४ हजार पुर्ण झाले. महिलांसाठीचे शौचालयाची कार्यवाही सुरू केली नाही. तसेच सुलभ इन्टरनॅशनल संस्था पे ॲण्ड युज धरतीवर जो लाभ घेईल त्यांचेकडून पैसे घेऊन शौचालय बांधत असते. त्या बाबतीत कुठले कम्युनिकेशन करणेत आले नाही. पुन्हा शौचालयासाठी सर्वेक्षण करावे.

विभाग प्रमुख-घनकचरा :सफाई कर्मचारी भरती संदर्भात जे टेंडर काढले. ते कामगार विभागाकडून टेंडरची कार्यवाही चालू आहे.

श्रीमती शोभा वळसे :वार्डात छायानगरी हौसींग सोसायटी मध्ये नाला आहे. कचरा गाडी आली नाही. तर लोक तेथे नाल्यात कचरा टाकतात. ५-६ पाईप टाकून नाला बंद करावा.

श्रीमती ज्योती मोरे :माझ्या वार्डात एका ठिकाणी सहा वार्डाचा कचरा आणून टाकला जातो. ते थांबविण्यात यावे. कर्मचारी संख्या कमी आहे ते देण्यात यावे.

श्रीमती अर्जना निळकंठ :वार्ड क्र.९९ रोपळेकर हॉस्पीटल ते रिलायन्स मॉलकडे जाणाऱ्या रस्त्यावर जयस्वीट दुकानासमोर असलेली कचरा कुंडी बंद करावी.

मा.महापौर :सभा अर्धा तास तहकूब करण्यात येते. (वेळ दु.१-३० वा. पुन्हा ३-१५ वाजता सभेला सुरूवात)

श्री राजू शिंदे :साफसफाई कर्मचारी कमी आहे. आऊट सोर्सींगवर कर्मचारी भरती संदर्भात जानेवारी मध्ये टेंडर काढले. पुढे कार्यवाही का झाली नाही.

कामगार अधिकारी :महापालिकेच्या विविध विभागामध्ये आवश्यकतेनुसार ५०० सफाई मजूर बचत गटा सहित, खाजगी वाहनचालक, सुरक्षा रक्षक, टेक्निकल स्टॉप, संगणक चालक अशी पदे भरण्याकरीता टेंडर काढणेसाठी मा.आयुक्त यांची ८ फेब्रुवारी १७ रोजी मान्यता मिळाली. दिनांक २८-०२-१७ रोजी टेंडर काढण्यात आले. सात दिवसाचा वेळ दिला. तीन दिवस सुट्टी होती. टेंडर भरणारे यांना दोन दिवस वर्कींग दिवस मिळत होते.

श्री.राजू शिंदे :टेंडर भरण्याच्या कालावधीत सुट्टया येत असल्याचे टेंडर भरणाराला माहित असेल, या प्रकरणात कमेटी नेमली होती. किमान तीन टेंडर आले पाहिजे ते आले होते का? उशीर झाला.

कामगार अधिकारी :तीन टेंडर आले त्यात एका टेंडर धारकाची उलाढाल ५० कोटी पेक्षा कमी येत होती. त्यांनी अर्ज केला की, आमची संस्था कोऑपरेटीव्ह आहे. ज्यांची एक कोटीच्या वर उलाढाल असेल त्यांचेच ऑडीट सी ए च्या मार्फत केले जाते. त्याचे नंतरचे जे आहे. डीडीआरचे आहे. ते सादर करून ठेवले. ती मान्यता घेऊन टेंडर काढले. त्यात तीन एजन्सी होत्या. सुंदर कन्स्ट्रक्शन,स्वयरोजगार सहकारी संस्था व महाराजा एजन्सी होत्या. सुंदर कन्स्ट्रक्शन यांचे दर सर्वात कमी होते ते दर २०१० च्या शासन निर्णयानुसार भरले होते. जे की, सरासरीपेक्षा ते कमी होते. ६ मार्च २०१५ शासन निर्णय आहे. त्यानुसार दर भरणे आवश्यक होते. ते समोर ठेवून कमेटीला तसे सांगितले. ती संचिका अंतिम होऊन ६ मे २०१७ ला आली.

श्री.राजेंद्र जंजाळ :टेंडर मध्ये दर कमी भरले असले तरी करारनामा करतांना शासनाने जे दर ठरवून दिले त्यानुसार द्यावे लागेल. असे ठरवून देतो. तो कमी पैसे भरत असेल व वाढीव पैसे ती एजन्सी देणार असेल तर हरकत नव्हती.

कामगार अधिकारी :बेसीक जो एम्प्लायर आहे त्यावर ती जबाबदारी येते. रेट पृथ्थकरण मागितले.

श्री.राजेंद्र जंजाळ :जे शासनाने रेट ठरवून दिले. ॲक्स नुसार जेवढे पैसे त्या कर्मचाऱ्याला द्यायला पाहिजे ते ठरवून देतो.

| | |
|---|---|
| कामगार अधिकारी | :त्यांचे रेट पृथ्थकरण मागितले. ते मजूरांना ५५०० रूपये देतील आणि ते मीनीमम रेजेस ॲक्ट नुसार देता येत नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :एजन्सीला वाटाघाटीसाठी बोलविले पाहिजे होते. तो यापेक्षा वाढीव देणार असेल तर अंतिम करता आले असते. परंतु टेंडर डायरेक्ट रद्द करणे योग्य नाही. जाणूनबूजून ही टेंडर प्रक्रिया रद्द केली असे वाटते. यावर मा आयुक्तांनी अभ्यास करून जे दोषी असेल कार्यवाही करावी. नव्याने निविदा काढून कार्यवाही करावी. |
| श्री.राजू शिंदे | :कुणाला काम द्यायचे व ज्यांना द्यायचे नाही. त्यासाठी महापालिकेत काय होऊ शकते हे उदाहरण समोर आहे. एखाद्या संस्थेला पत्र द्यायला लावायचे की, मी सुशिक्षित बेरोजगार आहे. त्याचा आधार घेतला. मी इएमडी कमायला माफ आहे. मला टेंडर भरता आले नाही. टेंडर रिकॉल करावे. त्यासाठी रिकॉल केले असेल तर योग्य नाही. शासन जीआर आहे. त्यानुसार सर्व गोष्टीची अंमलबजावणी करणार आहे का? या प्रकरणात कमेटी केली होती. कमेटीकडे संचिका गेली नाही. ती सचिका माझ्याकडे आहे. डायरेक्ट सीईओ मॅडम व मा.आयुक्तांची सही घेतली. कमेटीकडे संचिका का गेली नाही? पाच महिने अगोदर लोक भरती केले असते. रॅकींग मध्ये मनपाचा नंबर आला असता. एक टन कचरा उचलण्यासाठी ३३०० लागतात. तोच खर्च ११०० रू नेऊ शकतो त्यानुसार काम करावे. कमीत कमी खर्च स्वच्छतेचे काम कसे होईल. यासाठी प्रयत्न करावे. सर्व संचिकाची माहिती द्यावी. अशी दिरंगाई होत असेल तर योग्य नाही. |
| श्री.गजानन मनगटे | :कामगार कायद्यानुसार कमीत कमी किती? दर एजन्सीने भरल्यावर नियमात बसत नाही. ही अट टाकायला पाहिजे. |
| मा.महापौर | :शासनाने जे दर ठरवून दिले त्या खाली येताच येत नाही. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :सर्वेक्षणच्या मध्ये एजन्सीने १०० टक्के बिलाने टेंडर भरले होते. हा व्यक्ती मीनीमम रेट कामगार ॲक्ट नुसार पैसे कामगाराना देत असेल तर मनपाला अडचण नाही. त्यास वाटाघाटीसाठी बोलवायला पाहिजे होते. |
| श्री.राजू शिंदे | :पाणीपुरवठ्याचे टँकरचे टेंडर होते. संबंधीतास द्यायचे नव्हते. दुसऱ्या दिवशी जाहीर प्रगटन दिले की, जे ४८ तासापेक्षा जास्त वेळ कारागृहात असेल तर टेंडर भरता येत नाही. पुन्हा लक्षात आले की, असे करता येत नाही, पुन्हा नोटीस काढली की, ती अट रद्द करीत आहे. तीन टेंडर आले. अपात्र ठरले पुन्हा तेच काम एकाला ६७(३) सी मध्ये देण्यात आले. हे योग्य नाही. |
| मा.आयुक्त | :टेंडर प्रकरणात मी तपासणी करून घेतो. लवकरच त्या संचिकेबाबत कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :२००८ ते २०११ या दरम्यान रॅमकी एजन्सीने स्वच्छतेचे काम केले. १० वर्षाचा करारनामा असतांना ३ वर्षात कंपनीने काम सोडल. कोर्ट प्रकरण चालू त्याची काय स्थिती आहे? |
| श्री.राजू शिंदे | :रॅमकीच्या लवादा मार्फत प्रकरण चालू आहे. तेथे मनपाचे अधिकारी उपस्थित नसतात. |

विधी सल्लागार :या प्रकरणात ॲरबीस्ट्रेशन निवृत्त न्यायधीश श्री.इभोले साहेब यांचेकडे चालू आहे. यात रिटन सबमिशन मनपातर्फे दाखल केले. निकालाच्या प्रतिक्षेत आहे. त्यांनी मनपा विरूध्द ३४ कोटीचा क्लेम केला. मनपाने त्या एजन्सीच्या विरोधात ३८ कोटी काउंटर क्लेम दाखल केला.

श्री.राजू शिंदे :एका वेळेस सुनावणीसाठी १ ते १.२५ लक्ष खर्च लागतो.

विधी सल्लागार :मुंबईला हेअरींग झाली. तर जास्त पैसे लागते औरंगाबादला झाली. तर कमी खर्च येतो.

श्री.नंदकुमार घोडले :त्या प्रकरणाची संक्षिप्त टिप्पणी घ्यावी. मनपाचे किती नुकसान झाले.

मा.महापौर :सविस्तर माहितीची टिप्पणी सभागृहाला सादर करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :माझेकडे काही सुचना आहे. त्यांचे पालन केले. तर शहर स्वच्छतेच्या बाबतीत आघाडीवर राहिल. अशी अपेक्षा आहे. सफाई कर्मचारी किती यादी मागितली दिली नाही. अनेक लेबर चारचाकी वाहनात येतात. मस्टर मागवितात. सह्या करतात. निघून जातात. काहीनी त्यांचे जागेवर दुसरे कर्मचारी कामाला लावले. अशा कर्मचाऱ्याचा शोध लावून जेथे कर्मचारी संख्या कमी आहे, तेथे हे कर्मचारी दिले पाहिजे. जी वाहने वापरतो, त्याची स्थिती चांगली नाही. मा.पालकमंत्री महोदय, यांनी डीपीडीसीच्या माध्यमातून १०० रिक्षा उपलब्ध करून दिल्या होत्या. आणखीही देणार आहे. आपल्या स्तरावर प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावा. शासनाने प्लास्टीक निर्मुलन साठी काही सुचना दिलेल्या आहेत. मागिल बैठकीत सुचना केल्या होत्या. प्लास्टीक कचऱ्याचे निर्मुलन होऊन त्रि-मासिक अहवाल शासनाला पाठवावा. असे निर्देश असतांना अहवाल शासनास पाठविला जात नाही. प्लास्टीक शोधण्यासाठी टीम बनविल्या परंतु ते मोठ्या मॉल मध्ये जाऊन संबंधीताकडून पैसे घेऊन कार्यवाही करीत नाही. यांचेवर कार्यवाही करावी. शहरात येणारे प्लास्टीक थांबविण्या बाबत नियोजन करावे. मोठे हॉटेल मंगलकार्यालय आहे. कुजलेले अन्न उचलून त्याचे डिस्पोजल हे त्या एजन्सीने त्यांचे पध्दतीने करायचे असे ठरले. परंतु हे अन्न नारेगाव डंपींग ग्राऊडवर नेले जाते. हे अन्न तेथे टाकण्यासाठी सुरक्षांना पैसे दिले जातात. त्याची चौकशी व्हावी. बायो मेडीकल ठेकेदारा विषयी अनेक तक्रारी आल्या. चौकशी नेमली होती. अहवाल दिला नाही. ते मटेरियल तो ठेकेदार घेऊन जात नसल्याने रस्त्यावर, कुंडीवर येते. त्या बाबतही योग्य निर्णय घ्यावा. उड्डाणपुलाच्या खाली भिकारी राहतात. तेथेच ते घाण करतात त्यांना तेथून घेऊन रात्र निवारामध्ये ठेवले पाहिजे. याकडे लक्ष देण्याची गरज आहे. उड्डाणपुलाच्या खाली असलेला कचरा दररोज उचलला जावा. रस्त्यावर व पोलवर अनेक पोस्टर लावले. कार्यवाही होत नाही. शहर विद्रुप करण्यात यांचा हात आहे. बांधकामाचे मटेरियल रस्त्यावर पडलेले दिसते. जे सफाई मजूर आहे. त्यांचेकडून सफाईचेच काम करून घेतले जावे. काही सफाई कर्मचारी अधिकारी यांचे घरी आहे. त्याचाही शोध लावावा.

श्रीमती सायरा बानो :लेबरची संख्या कमी आहे. केंद्र शासनाची कमेटी आली. त्यांनी काय सजेशन दिले? डंपींग ग्राऊंडची जागा किती? किती जागेची आवश्यकता आहे? किती

कचरा तेथे जमा होतो? कुचलेले अन्न ग्राऊडवर जाऊ नये यासाठी काय उपाययोजना केल्या? ८ महिन्यापुर्वी ग्राऊंडवर एका व्यक्तीचा स्फोटने मृत्यू झाला एफआयआर दाखल का केला नाही? शहांगज भाजी मंडई व किराडपूरा येथील कचरा उचलला जात नाही.

श्री.गजानन बारवाल :नाल्यात अनेक लोक कचरा टाकतात तो साफसफाई करावी. शासकीय कार्यालयातील कचरा जमा करून बाहेर टाकला जातो. उचलला जात नाही. गार्डन मधील कचरा उचलला जात नाही. झाडाची कटाई होते. घाण रस्त्यावर पडून असते. वाहने वाढवावी. खाजगी लोकांना काम दिले ते सफाईचे काम चांगले करीत नाही. पाहणी करावी. त्यांचेकडून काम काढून घ्यावे.

श्री.अय्युब जागीरदार :क्रमांक ५७ वरून २९९ वर जातो. ही बाब महापालिकेच्या दृष्टीने योग्य नाही. यास एकच व्यक्ती जबाबदार नाही. शहराची लोकसंख्या विचारात घेता ४५०० सफाई कर्मचारी आवश्यक असतांना १७०० सफाई कर्मचारी काम करतात जे की, एका वार्डसाठी १५-१६ कर्मचारी येतात. त्यातही काही कर्मचारी गैरहजर असतात. १०-१२ कर्मचारी दररोज हजर असतात. त्यांचेकडून सफाई होत नाही. ज्यांची पात्रता नाही त्यांना जवान, स्वच्छता निरीक्षक केले जाते. हे योग्य नाही. जी चुक झाली. ती पुढे होऊ नये. यासाठी नियोजन करावे. १९९० मध्ये १७ टिप्पर, १० ट्रक, खाजगी ट्रॅक्टर ५, रिक्षा २३५ होत्या. २ वर्षापूर्वी रस्ते साफ करण्यासाठी ७० लक्षची मशीन खरेदी केले. त्या ऐवजी ७० छोट्या रिक्षा घेऊ शकलो असतो. किरायाच्या रिक्षा ठेवण्याची गरज पडली नसती. शौचालयाचे काम तातडीने करावे. केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडून ३००० कोटी विशेष निधी आणावा. टॉपटेन मध्ये येण्यासाठी सर्वानी मिळून स्वच्छतेसाठी काम करावे. रोषणगेट बाजूला हॉटेलवाले घाण आणून टाकतात. रस्त्यावर कचरा टाकतात. ऑऊट सोर्सीगवर लेबर तातडीने घेणेत यावे. ठराविक एजन्सीसाठी अटी शर्ती शिथील केल्या जातात. ज्यांना काम द्यायचे नाही त्यांचेसाठी जाचक अटी टाकल्या जातात. हे योग्य नाही. अटी शर्ती शिथील कराव्यात. जे की, सामान्य व्यक्तीही टेंडर भरू शकेल. इंदौर शहराला भेट देणेसाठी कमेटी पाठवावी. त्यानुसार या शहरासाठी काही नियोजन करून कार्यवाही करता येईल.

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

श्री.राजू शिंदे :ज्या त्या वार्डातील कचरा जागेवर त्याच वार्डात डंपीग करावा.

श्री सचीन खैरे :माझ्या वार्डात पर्यटन स्थळाच्या ठिकाणी साफसफाई होते. वार्डात होत नाही. वाहने कमी आहे कर्मचारी नाही. स्मशानभुमीमध्ये कचरा डंपींग केला जातो लोकांना वास येतो. जास्त कचरा तेथे डंपीग करू नये.

मा.आयुक्त :केंद्र शासनाने स्वच्छता मिशन सुरू केले. २०१७ च्या सर्वेक्षणामध्ये स्वच्छता मोहिमेत औरंगाबादचा २९९ क्रमांकावर समाधान मानावे लागले. केंद्र शासनाने केलेल्या सर्वेक्षणामध्ये कुठे कमी पडलो? प्रश्नावली नुसार ती तयारी केली होती किंवा कसे? माहिती दिली होती की नाही? मजुरांची उपस्थित असलेली संख्या वार्डनिहाय किती? नाला सफाई, कचरा डेपो स्थलातरीत करणे, कर्मचारी

भरतीसाठी टेंडर मध्ये होणारी दिरंगाई, रॅमकी बद्दलची माहिती, प्लास्टीक संकलन व डिस्पोजल करणे बाबतचे धोरण काय? त्यावर बंदी आणणार आहे किंवा नाही? तसेच नारेगाव येथील डंपिंग ग्राऊंडच्या असे अनेक विविध प्रश्न उपस्थित झाले. प्रश्नावली आहे. त्यात अशी विचारणा केली होती की, वार्डामध्ये कचऱ्याचे वर्गीकरण होते का? या कचऱ्याचे ट्रान्सपोटेशन व डिस्पोजल हे वेगळया पध्दतीने वाहून नेला जातो का? दररोज कचरा वाहतूक होते का? खास करून जेथे कमर्शियल भाग आहे. दोन वेळा सफाई होते का? कचरा जमा करणारे कर्मचारी यांना ओळखपत्र दिले काय? रविवारी किंवा सणाच्या दिवशी रेग्युलर कचरा सफाई होते काय? कन्स्ट्रक्शन व तोडलेल्या इमारतीचे मटेरियल स्वतंत्रपणे उचलले जाते काय? कचरा वाहून नेणारे ट्रॅकवर जीपीएस ट्रॅक सिस्टम बसविली काय? कचरा प्रोसेसिंग प्लॅन इस्टॉल केलेला आहे किंवा काय? स्वच्छता निरीक्षकास ट्रेनिंग दिले आहे किंवा नाही. स्वच्छतेचे बॅनर्स मार्केट किंवा इतर ठिकाणी लावले आहे काय? सीटी ओडीएफ झाली किंवा नाही? पब्लीक टॉयलेट झाले आहे किंवा नाही, असे अनेक प्रश्नावली आहे. प्रश्नावलीनुसार जेंव्हा महिती गोळा केली आणि सर्व गोष्टीचे डाकुमेटेशन केले त्यात ७९४ म्हणजे ३५ टक्के मार्क पडलेले आहे. त्या पथकानी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. कमर्शियल ठिकाणी बसस्टॅण्ड रेल्वेस्टेशनवर पाहणी केली. त्यात फारशी अवस्था चांगली नाही. असे आढळून आले. सीटीजन फिल्डबाय घेण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यांनी असे विचारले की, मागिल वर्षी पेक्षा या वर्षी काय सुधारणा झालेली दिसून येते. स्वच्छता ॲप तयार केले, ते किती लोकांनी डाऊनलोड केले. सिटीजन फिल्डबाय मध्ये ४० टक्के गुण मिळाले. प्रत्यक्ष पाहणी केली. त्यात ३५ टक्के गुण दिले. या कारणामुळे क्रमाक खाली गेला. आयुक्तांसह स्वच्छता निरीक्षक व सफाई कामगार धरून १८२२ कर्मचारी आहे. वाहने ६२२ उपलब्ध आहे. या सगळयाचा उपयोग कचरा संकलन करणे व प्रोसेसींग कशी करता येईल? यासाठी प्रयत्न करावे लागेल. मनपास चांगल्या प्रकारे स्वच्छता करण्यासाठी एक धोरण ठरवावे लागेल. त्यात कचरा प्रक्रिया केंद्र उभारावे वार्डातील कचरा जमा करून त्याच वार्डात तो डिस्पोजल करणेकरीता जमीन उपलब्ध करून देणे. प्रभावीपणे स्वच्छते होण्याकरीता १० सुत्री कार्यक्रम तयार केला. त्यात कचऱ्याचे वर्गीकरण ओला व सुका कचरा वेगळा करण्यासाठी जनजागृती करावी लागेल. यासाठी प्रत्येक को-ऑपरेटीव्ह ग्रुप हौसींग सोसायटी स्कीम असेल, हॉस्पीटल मंगल कार्यालय असेल या सर्व लोकांशी एक संयुक्त बैठक घेणार आहे व कचरा वेगळा करणे अतिशय आवश्यक आहे व ओला व सुका कचरा जमा करण्यासाठी सीएसआरच्या माध्यमातून डस्टबीन देणार आहे. ४००० डस्टबीन वाटपाचा कार्यक्रम लवकरच घेत आहेत. तो कचरा जमा करून वाहून नेता येईल. नारेगांव येथील कचरा डंपींग करतो ते प्रमाण कमी करावे लागेल. यासाठी केंद्राचे पथक आलेले आहे त्यांनी केमीकल वापरून त्या कचऱ्याचे खतामध्ये रूपातर करण्याचे ठरविले आहे. चार महिन्यात कार्यवाही होईल. सध्या ५६ एकर जमीन तेथे उपलब्ध आहे

एवढ्या जमीनीची आवश्यकता नाही. १५ एकर जमीन असेल तरी काम होईल. नारेगाव येथील कचरा डेपो मा.न्यायालयाच्या आदेशानुसार स्थलांतरीत करायचा आहे. त्यासाठी जागा उपलब्ध करून ठेवणे प्राधान्य आहे. काही ठिकाणी जागा आहे सर्वांच्या सम्मतीने ठरवू. कचरावर प्रक्रिया करावी लागेल दोन संस्था या कामासाठी पूढे आल्या आहेत. एको निर्मिती नावाची संस्था आहे. मोफत वाहतूक व प्रोसेसींग करण्याचे कबूल केले. परवानगी दिली. ती संस्था प्रायोगिक तत्वावर ४-५ वार्डातील कचरा घेऊन जाणार व प्रोसेसींग करणार त्यांना एक जमिन उपलब्ध करून दयावी लागेल.

श्री.राजू शिंदे :एक झोनचे पुर्ण काम त्या एजन्सीला द्यावे. चिकलठाणा भागात त्यास जागा उपलब्ध करून देऊ शकतो.

श्री.नंदकुमार घोडेले :श्री.राम भोगले यांनी कचऱ्याच्या संदर्भात एक प्लॅन्ट केला. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास हरकत नाही.

मा.आयुक्त :ज्योतिनगर येथील सोसायटीत व्हिजीट दिली. त्या लोकांशी चर्चा केली. तो प्लॅन्ट ते बसविणार आहे. वार्डातील कचरा वार्डातच जिरवावा लागेल.शॉटींग शेड सेंन्ट्रल नाका येथे तयार केले तसे प्रत्येक वार्डात शेड सीएसआरच्या माध्यमातून करण्याचे प्रयत्न केले जातील. कचरा जमा करणे, वाहतूक करणे व डिस्पोजल करणे यासाठी खाजगी संस्थाची मदत घेणार आहे.कचरा डिस्पोजल कारवाईची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी लागेल. ९ वार्ड साठी पालक, अधिकारी नियुक्त केले. नाल्याची साफसफाई मोहिम हाती खाजगी संस्थेच्या माध्यमातून किंवा मनपाच्या मार्फत रेग्युलर जे नाले सफाई करावी लागते. ती करण्यात येईल.

श्री.राज शिंदे :भुमिगत गटार एजन्सीने नाल्यामध्ये लाईन टाकली. नाल्यात त्यांनी जास्त घाण करून ठेवली. त्यांचेकडून साफसफाई करावी. तसे पत्र एजन्सीला दयावे.

मा.आयुक्त :मोहल्ला कमेटी स्थापन करणार आहे. कर्मचारी हजर नसतील तर ते वार्ड पालक, अधिकारी यांना कळवतील. जे गैरहजर असतील कार्यवाही होईल. मजुरांना आवश्यक साहित्य दिले जाईल. तसेच स्वच्छतेच्या बाबतीत स्पर्धा घेण्याचा मानस आहे. त्या माध्यमातून जनतेमध्ये जनजागृती करू चांगला संदेश जनतेला जाईल. १० सुत्री कार्यक्रम सुरू करण्याची अंमलबजावणी होईल. वेळेवर स्वच्छता व्हावी. यासाठी कर्मचारी यांना निर्देश दिले. हलगर्जी केल्यास निलंबीत केले जाईल. प्लास्टीक पन्नी बंदी बाबत नोटीस काढून तसेच नाल्यामध्ये कचरा टाकणाऱ्यांवर कार्यवाही होईल. बॅनर्स लावून रिक्षाच्या माध्यमातून स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाईल. पुढील वर्षी निश्चित हे शहर टॉपटेन मध्ये येईल.

श्री.सुरे सिताराम :वार्ड समिती झोन ५ साठी पुर्ण वेळ अधिकारी द्यावे.

श्रीमती सिमा खरात :१० सुत्री कार्यक्रम कागदावर न राहता अंमलबजावणी करावी. जेंव्हा आयुक्त वार्डात भेटीसाठी येणार असेल त्यावेळी त्या वार्डाचे सदस्यांना कल्पना द्यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :नगरसेवक यांनी त्यांच्या स्वेच्छा निधीतून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास परवानगी द्यावी.

श्रीमती माधुरी देशमुख :१० तारखेच्या महाराष्ट्र टाईम्स मध्ये ओएसडीसाठी नेहरूनगरची जागा देणार असे दिले. जे की पिडीत महिलेला एकाच ठिकाणी आरोग्य सुविधा मिळण्याचे सेन्टर दोन वर्षापासून या जागेची मागणी होत होती. केंद्र शासन सर्व खर्च करणार आहे.जी जागा सहज उपलध होईल अशी जागा देण्यात यावी.

श्री.सय्यद मतीन :टाऊन हॉल ते मकईगेट रस्त्यावरील कचरा दररोज उचलला जात नाही.

आरोग्य वैद्य.अधिकारी :ओएसडीसाठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडून पत्र प्राप्त झाले की, पिडीत महिलेच्या उपचारासाठी केंद्र शासनाच्या आदेशानुसार जागा मागितली होती. ती जागा रूग्णालयात किंवा त्यापासून एक-दोन कि.मीटर अंतरावर असावी. तर नेहरूनगर येथील रूग्णालय दोन मजली आहे. त्यावरील स्वतंत्र व्यवस्था असलेली जागा मा.आयुक्तांच्या मंजूरीने तात्पुरती उपलब्ध करून दिली.

मा.महापौर :स्वच्छतेच्या बाबतीत स.सदस्यांनी वेगवेगळे मुद्दे मांडले.आवश्यक सजेशनही दिले प्रशासनाने १० सुत्री कार्यक्रम राबविण्याचे सांगितले.प्रशासनाने प्रयत्न केले काही उणीवा राहिल्या सर्व प्रयत्न करून सुध्दा २९९ क्रमांक आला.टॉपटेन मध्ये यायचे असेल तर १० कलमी कार्यक्रम बरोबरच जनतेमध्ये जनजागृती निर्माण करणे आवश्यक आहे.स्वच्छतेच्या बाबतीत प्रशासना बरोबर आम्ही सर्व आहोत.मजूर संख्या कमी आहे त्यांचे पगार वेळेवर होत नाही.वाहनावर दुरूस्तीचा खर्च मोठा होतो.हॉटेलचा कचरा विल्हेवाट लावली जात नाही, व्यापारी भागात दोन वेळेस कचरा उचलला जात नाही.कॅरीबॅगवर कन्ट्रोलिंग करता आले नाही.आताच सदस्यांनी भावना व्यक्त केल्या एवढा खर्च करून सुध्दा नंबर मागे जातो आताच सदस्यांनी म्हटले की एक टन कचरा उचलण्यासाठी ११८२ इतका खर्च इतर मनपात येतो या मनपात तोच खर्च ३४७२ होतो.तीन पट जास्त खर्च होतो.५० कोटी खर्च होतो.तफावत मोठी आहे. मॅन पावर नाही पैसे जास्त खर्च होतो.खर्चकरून सुध्दा शहर स्वच्छ नाही २९९ वर येतो.यातून पुढे जायचे असेल तर पुढील पाऊल टाकणे आवश्यक नवीन नियोजन करून ते अमलात आणावे लागेल.डंपींग ग्राऊड कुठेच ठेवण्याची परवानगी नाही. कच-याची विल्हेवाट लावण्याकरीता प्रोसेस युनीट करावे लागणार आहे. दोन तीन ठिकाणी जागा घेऊन युनीट करता येईल का ? नारेगाव येथील प्रोसेस युनीट टाकावे लागणार आहे. यासाठी मायक्रोप्लॅनींग करावे लागेल.हे करणेसाठी अनेक कंपन्या मार्केटमध्ये आहे.कच-याचें सेंद्रीयखत तयार करता येते. टॉपटेन मध्ये येण्यासाठी ५० कोटीचा खर्च १७ कोटीवर आणून सफाईचे मजूर वसुलीसाठी देता येत असेल तर ती कार्यवाही करावी. खाजगी संस्थेमार्फत कच-याचे संकलन करणे व विल्हेवाट लावण्यासाठी कार्यवाही करावी. नारेगाव डंपींग ग्राऊडवर कच-याचे खत प्रोसेस होत आहे तेथील कच-याचे प्रोसेसींग करून तेथील कचरा कमी करावा.त्यासाठी मशीनरी खरेदी करावी. ते ग्राऊंड खाली व्हावे यासाठी प्रयत्न करावा जे की मा.कोर्टाचे आदेशाचे पालन व्हावे व पर्यावरणाचे संतुलन राहिले पाहिजे. सीआरटी ला कंपनीकडून पैसे दिलेले होते त्या एजन्सीकडून खर्चाचा सन्मानपुर्वक हिशोब घ्यावा. कर्मचारी भरती संदर्भात टेंडर बाबत कार्यवाही करावी. कचरा जमा

करणेसाठी कोणत्या वेळेस कुठे गाडी येणार हे त्या त्या भागातील नागरीकांना निदर्शनास आणून दयावे. आपण सर्व प्रशासन स.पदाधिकारी व स.सदस्य व जनता या मोहिमेत सामिल होत नाही तोपर्यत आपण टॉपटेनमध्ये येऊ शकणार नाही. खाजगी संस्थे मार्फत कचरा संकलण करणे व त्याची विल्हेवाट लावणेसाठी निविदा काढावी. स्वच्छतेबाबत दर महिण्याला आढावा घ्यावा. मोहल्ला कमेटी करावी. तसेच व्यापारी संघटनेशी सुध्दा चर्चा करून कमर्शियल भागातील कचरा उचलण्याकरीता त्याची आवश्यक मदत घ्यावी. हे ऐतिहासिक शहर आहे शहर स्वच्छ करणेसाठी सर्वानी सहभागी व्हावे. सर्वांचे सहकार्य मिळावे हे शहर स्मार्ट सिटी कडे वाटचाल करेल व स्वच्छतेच्या बाबतीत टॉपटेन मध्ये कसे येईल यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. तसेच कचरा व्यवस्थापनावर झालेला वार्षीक खर्च ६०-६५ कोटी याचे सोशल ऑडीट करावे. त्याचा अहवाल सादर करावा व हे शहर स्वच्छतेसाठी सर्वानी सहकार्य करावे. असे सर्वाना आवाहन करतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, औरंगाबाद शहर सुंदर व स्वच्छ ठेवण्यासाठी खालील बाबींचे योग्य ते नियोजन करून अंमलबजावणी करण्यास मंजुरी देण्यात येते.

१. स्वच्छतेच्या बाबतीत प्रशासनाने १० सुत्री कार्यक्रम राबविण्याबाबत कार्यवाही करावी.
२. जनतेमध्ये जनजागृती निर्माण करणे,स्वच्छतेच्या बाबतीत नियोजन करून ते अंमलात आणणे.
३. डंपींग ग्राऊंड कुठेच ठेवण्याची परवानगी नाही. कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरीता प्रोसेस युनीट करावे.
४. नारेगाव येथील प्रोसेस युनीट करण्याकरीता मायक्रोप्लॅनींग करणे, कचऱ्याचे सेंद्रीय खत तयार करणे.
५. औरंगाबाद शहर टॉपटेन मध्ये येण्यासाठी सद्यस्थितीत होत असलेला ५० कोटीचा खर्च १७ कोटीवर आणून खाजगी संस्थेमार्फत कचऱ्याचे संकलन करणे व विल्हेवाट लावण्यासाठी कार्यवाही करावी. तसेच मनपा आस्थापनेवरील साफसफाई कर्मचारी यांना वसुलीचे काम देणे.
६. नारेगाव डंपींग ग्राऊंडवर कचऱ्याचे खत प्रोसेस करून डंपींग होत असलेला कचरा कमी करणे, त्यासाठी आवश्यक मशीनरी खरेदी करणे. जे की मा.कोर्टाचे आदेशाचे पालन व्हावे व पर्यावरणाचे संतुलन राहिले पाहिजे.
७. सीआरटी कंपनीला दिलेल्या पैश्यातून केलेल्या कामाचा हिशोब घेणे तसेच कर्मचारी भरती टेंडर बाबत कार्यवाही करणे.
८. कचरा जमा करण्यासाठी कोणत्या वेळेत गाडी येणार याची वेळ निश्चित करून तसे नागरीकांना निदर्शनास आणून दयावे.
९. खाजगी संस्थे मार्फत कचरा संकलण करणे व त्याची विल्हेवाट लावणेसाठी निविदा काढावी.

१०. स्वच्छतेबाबत दर महिन्याला आढावा बैठक घेणे, मोहला कमेटी करणे तसेच व्यापारी संघटनेशी सुध्दा चर्चा करून कमर्शियल भागातील कचरा उचलण्याकरीता त्यांची आवश्यक मदत घेणे.
११. कचरा व्यवस्थापनावर झालेला वार्षीक खर्च ६०-६५ कोटी याचे सोशल ऑडीट करून अहवाल सादर करावा.

हे शहर स्मार्ट सिटी कडे वाटचाल करेल व स्वच्छतेच्या बाबतीत टॉपटेन मध्ये कसे येईल यासाठी प्रशासनाने वरील सर्व बाबींबाबत योग्य ते नियोजन करून कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपविण्यात येते.

(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी)
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद